**NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE**

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(दुपार)

**दिनांक १७.०८.२०२६ सोमवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक १६.०८.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ कायद्यान्वये १३ केसेसमध्ये १५ ईसमावर कारवाई करून एकुण ३,४९,२३०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जुगार कायदा अन्वये ०१ केसेसमध्ये ०५ इसमांवर कारवाई करुन ३५,७२०/—रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली १,९७९ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. ९१,०५०/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

दिनांक १६.०८.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक १७.०८.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये **०३** इसमावर कारवाई करण्यात आलेली आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा युनिट क्र. ३ पोलीसांची कामगीरी :— वाहनचोरी व घरफोडी असे एकुण ११ गुन्हे उघडकीस.**

दिनांक १२.०८.२०२६ चे १५.०० वा. ते १६.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे बेलतरोडी हद्दीत, प्लॉट नं. ३९ ए, रामकृष्ण सोसायटी, नरेंद्र नगर, बेलतरोडी, नागपुर येथे राहणारे फिर्यादी नारायण देवराव खोब्रागडे, वय ७४ वर्षे यांनी त्यांची अॅक्टीवा दुचाकी क्र. एम.एच. ४९ सि.जी. ९६१७ किंमती ४९,०००/—रू. ची आपले राहते घराचे गेट चे आंत ठेवली असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीची गाडी चोरून नेली. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे बेलतरोडी येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे समांतर तपासादरम्यान, गुन्हेशाखा युनिट क्र. ३ चे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रीक तपास करून व विश्वसनिय गुप्त बातमीदाराचे मार्फतीने मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून आरोपींला निष्पन्न केले व सापळा रचुन आरोपी सायमन उर्फ शेट्टी अॅन्थोनी फ्रान्सीस, वय २५ वर्षे, रा. ८५ प्लॉट, माता मंदीर समोर, अजनी, नागपुर यास ताब्यात घेवुन, त्यास विचारपूस केली असता, त्याने वर नमुद वाहनचोरी गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपीस अधिक सखोल विचारपुस केली असता, त्याने वर नमुद गुन्ह्याव्यतीरिक्त पोलीस ठाणे बेलतरोडी हद्दीत ईतर दोन वाहनचोरी व एक घरफोडीचा गुन्हे तसेच, पोलीस ठाणे अजनी हद्दीत दोन वाहनचोरी, सोनेगांव हद्दीत दोन वाहनचोरी, आणि पोलीस ठाणे कोतवाली, सिताबर्डी, भांडेवाडी हद्दीत प्रत्येकी एक असे १० वाहनचोरी व ०१ घरफोडी असे एकुण ११ गुन्हे केल्याची कबुली दिली. आरोपीचे ताब्यातुन १०

दुचाकी वाहने एकुण किंमती ४,१०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीला मुद्देमालासह पुढील कार्यवाहीस्तव बेलतरोडी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. अतुल मोहनकर व त्यांचे पथकाने केली.




**(गुन्हे)**

**<u>१) पोलीस ठाणे मानकापुर :— जुगार खेळणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक १६.०८.२०२६ चे २१.५० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे मानकापुर येथील तपास पथकातील अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असता, त्यांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, पोलीस ठाणे हद्दीत ताज नगर, गल्ली नं. ११, नाल्याजवळील एका झोपडीमध्ये पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, तेथे आरोपी क्र. १) राहुल कश्यम खरे, वय ३२ वर्षे, रा. निर्मल नगर, गोरेवाडा २) मंगेश शामराव भानारकर, वय ३५ वर्षे, रा. कुंदनलाल गुप्ता नगर, ३) अक्षय राजेंद्र मेश्राम, वय २५ वर्षे, रा. गल्ली नं. १०, ताज नगर, मानकापुर ४) किशोर मोतीराम सोरते, वय ६० वर्षे, रा. प्लॉट नं. ४३२, न्यु म्हाळगी नगर, ५) शाम दिलीप गव्हाणे, वय ३६ वर्षे, रा. प्लॉट नं. १४, नारी रिंगरोड, कपीलनगर ६) गणेश रमेश वासनिक, वय ३७ वर्षे, रा. ताज नगर, मानकापुर, ७) सुनिल शंकर शेळके, वय ३९ वर्षे, रा. यादव नगर, यशोधरानगर ८) वकील शेख कादीर शेख, वय ३८ वर्षे, रा. ताजनगर, मानकापुर हे ताशपत्यावर पैश्यांची बाजी लावुन हार—जीतचा जुगार खेळतांना समक्ष मिळुन आले. आरोपींचे ताब्यातुन रोख १४,५३०/—रू., ५२ ताश पत्ते, ०४ वेगवेगळया कंपनीचे मोबाईल व इतर साहित्य असा एकुण ९०,०३०/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. फिर्यादी पोउपनि. सुनिल डगवाल यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे मानकापुर येथे पोउपनि. उध्दव कोखरकर यांनी आरोपींविरूध्द कलम ४,५ महा. जुगार प्रतिबंधक अधिनियम अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे सक्करदरा :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक १५.०८.२०२६ चे १७.०० वा. ते दिनांक १६.०६.२०२६ चे ०६.४५ वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे सक्करदरा हद्दीत प्लॉट नं. २७, संत गजानन नगर, बहादुरा, नागपूर येथे राहणारे फिर्यादी विलास सुनिल होतकर, वय ३२ वर्षे हे आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह नविन घरी ८५ प्लॉट परीसर, अजनी येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे मुख्य दाराचे कुलूप व कडी—कोंडा तोडुन, आंत प्रवेश करून, घराचे देवघरात ठेवलेले व लोखंडी कपाटातील रोख १,००,०००/—रू. तसेच, सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती २,२७,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे सक्करदरा येथे पोउपनि. बाळाप्रसाद टेकाडे ८३९०९८८३२८ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**

**पोलीस उप निरीक्षक,**

**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**

**नागपुर शहर.**